

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ला. ला.
दा. क्र.

BVBK-0400461

# भारताची नररत्ने

श्यामकांत शिवरामे

# भारताचे महापुरुष

श्यामकांत शिवरामे

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ८६९ दिनांक
विषय बा. वा. क्र.

प्रकाशक :

**श्याम दयार्णव कोपर्डेकर**

इंद्रायणी साहित्य,

१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०.

□ □ □

मुद्रक :

**रा. य. कुंदूर**

सुमंगल मुद्रणालय,

१३५ नारायण पेठ, पुणे ३०

□ □ □

प्रकाशन दिनांक

१५ जानेवारी १९७६

□ □ □

**मूल्य : एक रुपया पन्नास पैसे**

# महान् पराक्रमी शिवाजी

भारतात अनेक पराक्रमी महान् सम्राट, राजे, बुद्धिमान व मुत्सद्दी आणि न्यायी राज्यकर्ते होऊन गेले. त्यांनी आपली छाप भारताच्या इतिहासावर पाडलेली आहे. परंतु हे सर्व गुण एकाच व्यक्तीत एकवटलेले क्वचितच दिसून येतात. शिवाजीच्या अंगी मात्र हे गुण त्याच्या बालपणापासूनच दिसून येत होते हे त्याचे वैशिष्टय होय. त्यामुळे शिवाजीच्या कर्तृत्वाची सुरुवात त्याच्या बालपणापासून जी झाली ती त्याच्या पुढील आयुष्यात अधिकाधिक उंचावत गेली.

शिवाजीचे वडील शहाजी राजे मोठे पराक्रमी व मुत्सद्दी होते. त्यांनाही मोगलांच्या सत्तेची चीड होती. त्यांनाही स्वराज्य स्थापण्याची इच्छा होती. परंतु दुर्दैवाने त्यांचा सहवास शिवाजीला फारसा मिळाला नाही. बालपणी त्याच्या शिक्षणाचे व त्याच्या आयुष्याला वळण लावण्याचे काम त्यांची दूरदर्शी व धोरणी आई जिजाबाई व त्यांचे हुषार आणि करारी कारभारी दादाजी कोंडदेव यांनी केले.

शिवाजी जन्मला त्यावेळी महाराष्ट्रात सर्वत्र धामधुमीचा काळ होता. तीनचारशे वर्षांपूर्वीपासून महाराष्ट्रात मोगलांनी व तुर्कांनी धुमाकूळ घातला होता. यावनी सत्ता आपापसात सत्तेसाठी लढत होत्या आणि त्यात महाराष्ट्र चिरडला जात होता. महाराष्ट्राची जनता लुटली जात होती. मराठे सरदार मुसलमानी सत्ताधिशांकडे चाकरी करीत होते. कोणालाही स्वातंत्र्य नव्हते. मोठमोठे शूर सरदारही नोकरासारखे परकीय सत्तेकरता राबत होते.

शहाजी राजेही कधी आदिलशहाकडे तर कधी मोगलांकडे सरदारकी करीत होते. त्यांनी एकदोन वेळ स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यात त्यांना यश आले नाही. ते आदिलशहाच्या पदरी सरदार होते. पुण्याची जहागीर त्यांच्याकडे वडिलोपार्जित चालत आलेली होती. जिजाबाईचे वडील दौलताबादच्या निजामशहाकडे सरदार होते. सर्व मराठे सरदार मोगलशाह. आदिलशाह निजाम किंवा कुतुबशहाच्या

BVBK-0400461

पदरी चाकरी करण्यात व त्यांची सत्ता टिकवण्याकरता पराक्रम गाजविण्यात धन्यता मानीत होते. मधून मधून काहीजण बंड करीत. परंतु त्यांची बंडे फारशी टिकत नसत. शेवटी ते एखाद्या यावनी सत्तेला शरण जात व त्यांची सरदारकी पत्करीत असत.

एकवेळ बादशाह निजामशहाने जिजाबाईचे वडील लखूजीराव जाधव व त्यांचें तीन भाऊ यांना कपटानें ठार मारले. लखूजीराव जाधव व शहाजी राजे यांचे संबंध सलोख्याचे व प्रेमाचे नव्हते. परंतु प्रत्यक्ष सासऱ्याला निजामशहाने कपटाने ठार मारल्यामुळे शहाजी राजांना चीड आली. यावनी सत्ताधीश हिंदू सरदारांना अशाप्रकारे अनेक वेळा ठार मारीत असत. त्यामुळे यापुढे मुसलमानी सत्ताधिशाकडे चाकरी कराचची नाही आणि स्वतंत्र राज्य स्थापन करायचे असे शहाजी राजांनी ठरविले. ते पुण्याला आले. पुण्याची जहागिरी त्यांचीच होती. ती विजापूरच्या आदिलशहाच्या सत्तेखाली होती.

शहाजी राजांनी बंड पुकारले. त्यांनी आपली जहागीर स्वतंत्र असल्याची घोषणा केली. त्यामुळे सर्वत्र धामधूम, लढाया, हल्ले, प्रतिहल्ले सुरू झाले. अशा परिस्थितीत जिजाबाईला दिवस गेलेले होते. शहाजी राजांना जिजाबाईच्या जिवाची चिंता होती. तिचे माहेर उध्वस्त झालेले होते. तिला माहेरीं जाता येणे शक्य नव्हते. म्हणून शहाजी राजांनी जिजाबाईला शिवनेरी किल्ल्यावर ठेवण्याचे निश्चित केले.

शिवनेरी किल्ला सुरक्षित होता. तेथील किल्लेदार विजयराघव शहाजी राजांच्या नात्यातला व विश्वासू होता. शहाजी राजांनी जिजाबाईला शिवनेरीवर पोहोचते केले. तिच्या सोबतीला आपले विश्वासू सरदार ठेवले व ते पुढे मोहिमेवर निघून गेले.

आदिलशहाने शहाजी राजांचे बंड मोडण्याकरता पुण्यावर मोठी फौज पाठविली. त्या फौजेने सबंध पुणे बेचिराख केले. शहाजी राजांचे मोठमोठे वाडे जाळून टाकले. पुण्यावर गाढवांचा नांगर फिरवला. शहाजी राजांचे बंड मोडून काढले. त्यामुळे शहाजी राजे हतबल झाले. नंतर त्यांनी आदिलशहाची सरदारकी पत्करली आणि ते दक्षिणेत निघून गेले.

शिवनेरीवर जिजाबाई एकटी राहिली. माहेरचें मायेचें कोणी नाही किंवा सासरचे जवळचे देखरेखीला कोणी नाही. विजयराघवची बायको दुर्गाबाई ही जिजाबाईची सख्खी जाऊ होती. तीच तिची जवळची नातलग होती.परंतु विजयराघवांनी जिजाबाईची चांगली काळजी घेतली. तिचे डोहाळे पुरवले. अशा परिस्थितीत जिजाबाईला शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी १६३० रोजी मुलगा झाला. जिजाबाईप्रमाणे शिवनेरीवर सर्वांना आनंद झाला. किल्ल्यावर सर्वांना साखर वाटण्यात आली. तोफा उडविण्यात आल्या. शिवनेरीवर मुलाचा जन्म झाला म्हणून जिजाबाईने मुलाचे नाव शिवाजी ठेवले.

शिवाजीचा जन्म झाला तेव्हा शहाजी राजे दक्षिणेत पराक्रम गाजवीत होते. दर्याखानाचा पराभव करून ते शिवनेरीवर आले आणि त्यांनी प्रथमच मुलाला पाहिले. मुलाला पहाताच शहाजी राजांना अतिशय आनंद झाला. त्यांनी पुत्रजन्माच्या निमित्ताने खूप दानधर्म केला. नंतर ते पुन्हा मोहिमेवर निघून गेले.

शिवाजी शिवनेरीवर मोठा होत होता. जिजाबाईचे त्याच्यावर फार प्रेम होते. शिवाजीच्या बाललीला पहाण्यात जिजाबाई मग्न होती. ती त्याला रामायण, महाभारतातील वीरांच्या शौर्याच्या गोष्टी सांगत असे. त्याच्या बालमनावर चांगले संस्कार करीत होती. मावळ्यांच्या मुलांच्याबरोबर शिवाजी लुटुपुटीच्या लढायांचा खेळ खेळत होता. शिवनेरीच्या किल्ल्यात शिवाजीचे बालपण जात होते.

लवकरच आदिलशहाचे व शहाजी राजांचे संबंध पूर्वीसारखे मैत्रीचे व सलोख्याचे झाले. आदिलशहाने शहाजी राजांना त्यांची पूर्वीची पुण्याची व सुप्याची जहागिरी परत दिली. परंतु त्यांना दक्षिणेकडे बंगळूरला पाठविले. म्हणून शहाजी राजांनी पुण्याची व्यवस्था पहाण्याकरता जिजाबाईला व शिवाजीला पुण्याला पाठविले. त्यावेळी शिवाजी सहा वर्षांचा होता. त्यांच्यावरोबर दादाजी कोंडदेव या हुषार कर्तबगार आणि माहीतगार कारभाऱ्याला पाठविले. त्याच्यावरच राजांनी सर्व जबाबदारी टाकली होती.

पुण्याला आल्यावर शिवाजीला अधिक विशाल व मोकळ्या वातावरणात फिरायला व शिकायला मिळाले. दादाजी कोंडदेवाने शिवाजीच्या शिक्षणाची चांगली व्यवस्था केली. त्याला लिहायला, वाचायला शिकवण्याकरता पंडितांची नेमणूक केली. त्याला तलवार, दांडपट्टा फिरवायला शिकविले. भालाफेक शिकविली. शिवाजी घोडदौड करू लागला. लांब लांबच्या प्रदेशात तो घोडदौड करू लागला. आपल्या सवंगड्यांबरोबर तो दऱ्याखोऱ्यात फिरू लागला. त्याने सर्व तीर्थक्षेत्रे पाहिली. साधुसंताचे दर्शन घेतले. दादाजी कोंडदेवाबरोबर शिवाजी बारा मावळ हिंडला व त्यांची त्याने माहिती करून घेतली. तो सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत हिंडला व त्याने डोंगराची, चोरवाटांची, किल्ल्यांची, आडमार्गाची खिंडींची, जंगलांची ओळख करून घेतली. सर्व प्रदेशाची त्याने स्वत: फिरून पहाणी केली.

शिवाजीने बेचिराख झालेली गावे पाहिली. देशमुख, वतनदार पाटील वगैरेनी लोकांवर केलेलें अत्याचार पाहिले. देशात धर्माला, स्त्रीच्या अब्रूला व लोकांच्या जीविताला किंमत उरली नाही असा त्याला अनुभव आला. शिवाजी वयाने लहान असला तरी समजुतीनें मोठा होता ! त्याच्या मनात परकीय सत्तेबद्दल चीड निर्माण झाली. ही गुलामगिरी झुगारून देऊन स्वातंत्र्याची स्थापना करण्याचे विचार त्याच्या मनात निर्माण होऊ लागले.

पुण्याला आल्यावर दादाजी कोंडदेवाने उध्वस्त पुणे पुन्हा वसवण्याचे काम हाती घेतले. जिजाबाई व शिवाजीकरता लालमहाल बांधला. परंतु एकदा उध्वस्त झालेल्या पुण्यात राहायला यायला लोक धजत नव्हते. म्हणून एक दिवस दादाजी कोंडदेवाने शिवाजीच्या हातून पुण्याची भूमी सोन्याच्या नांगराने नांगरली आणि सर्व भूमी पवित्र करून घेतली. जेथे यवनांनीं गाढवाचा नांगर फिरवला होता तेथे शिवाजीने सोन्याचा नांगर फिरवला. त्यामुळे लोकांची पुण्यावर श्रद्धा बसली. लोक उत्साहाने पुण्यात वसती करू लागले.

शिवाजी हळू हळू मोठा होत होता. जिजाबाई प्रजेचे न्यायदान स्वत: करीत असे. शिवाजी तिच्याबरोबर न्यायाला बसत असे. आईने व

दादाजी कोंडदेवाने प्रजेची गाऱ्हाणी व दुःखे कशी दूर केली हे पहात असे. मधून मधून तो साधुसंताचे दर्शन घेत असे व त्यांचा उपदेशही ऐकत असे.

शिवाजी दहा वर्षांचा झाला, तेव्हा जिजाबाईने त्याचे लग्न फलटणच्या निंबाळकारांची मुलगी सईबाई हिच्याशी ठरवले. लाल महालात मोठ्या धुमधडाक्याने लग्न केलें. या लग्नाला शहाजी राजे येऊ शकले नाहीत. थोड्याच दिवसांनी शहाजी राजांनी जिजाबाईला व शिवाजीला बंगळूरला बोलवून घेतले. तेथे राजांनी शिवाजीचे दुसरे लग्न करण्याचे ठरविलें. त्यांनी मोहित्यांची मुलगी सोयराबाई हिच्यावरोबर बंगळूरला शिवाजीचे दुसरे लग्न मोठ्या थाटामाटात केले.

बंगळूरला शहाजी राजे मोठ्या ऐश्वर्यात राहात असत. परंतु शिवाजीच्या मनावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. विजापूरच्या दरबारात आपण चाकरी करावी व ऐश्वर्य भोगावे असा किंचित्‌ही विचार त्याच्या मनाला शिवला नाही. शिवाजी व जिजाबाई काही दिवस बंगळूरला राहून तावडतोब पुण्याला परत आली. तेव्हा शहाजी राजांनी शिवाजीवरोबर काही कर्तबगार सरदार व 'पेशवा' पाठविला.

शिवाजीने आतापर्यंत बरेच अनुभवले व पाहिले होते. मोगलांची सत्ता आता त्याच्या डोळ्यात खुपू लागली होती. त्याने मावळ्यांची तरुण मुले गोळा केली. अनेक जिवलग स्नेही मिळवले. ते सर्वजण एकत्र जमून स्वराज्याचे मनसुबे रचू लागले. शिवाजीशी एकनिष्ठ राहण्याच्या शपथा घेऊ लागले. एक दिवस शिवाजी व त्याचे सवंगडी भोर तालुक्यातील रायरेश्वराच्या मंदिरात जमले. रायरेश्वर हे स्वयंभू शिवलिंग आहे. त्याच्या समोर शिवाजीने व त्याच्या सवंगड्यांनी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतलीं. तेव्हापासून शिवाजीने रायरेश्वराच्या पूजेची व्यवस्था केलीं. शिवाजीचीं महादेवावर आणि भवानीमातेवर अपार श्रद्धा होती. सर्व धर्मातील साधुसंतांनाही तो मान देत असे. स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली तेव्हा शिवाजी केवळ बारा वर्षांचा होता.

कोणावरही अन्याय झालेला शिवाजीला आवडत नसे. स्त्रियांवर अत्याचार झालेले त्याला खपत नसे. एकवेळ रांझ्याच्या पाटलाने एका स्त्रीवर अत्याचार केला. तेव्हा शिवाजीने त्याला तावडतोब बोलवणे

पाठविले. परंतु तो पाटील असल्याने मोठ्या गुर्मीत होता. त्याने नुसत्या निरोपाला दाद दिली नाही. तेव्हा शिवाजीने त्याला गिरफ्तार करून आणले. त्याची चौकशी केली आणि त्याचा गुन्हा शाबीत होताच कोपरापासून त्याचे हात व पाय तोडण्याची शिक्षा दिली त्यामुळे शिवाजीचा दरारा निर्माण झाला. लोक त्याच्याकडे आशेने पाहू लागले.

शिवाजीचे स्वराज्य स्थापनेचे विचार आता पक्के झाले होते. पण त्याकरता सुरक्षितता पाहिजे होती. आणि सुरक्षिततेकरता एखाद्या मजबूत किल्ल्याची आवश्यकता होती. त्याकरता शिवाजीने उंच व सुरक्षित असा तोरणा किल्ला आपल्या ताब्यात घेण्याचें ठरविले. तोरणा किल्ला आदिलशहाच्या ताब्यात होता. परंतु तिकडे त्याचे विशेष लक्ष नव्हते.

एक दिवस शिवाजी व त्याचे मावळे तोरणा किल्ल्यावर चढले व तेथे त्यांनीं 'हर हर महादेव' ची गर्जना केली आणि किल्ला ताब्यात घेतला. तेथे आपले चौकी–पहारे बसविले आणि स्वातंत्र्याचा भगवा झेंडा फडकविला. तोरणा हे नाव बदलून त्याचे 'राजगड' हे नाव ठेवले. स्वराज्य-स्थापनेची सुरुवात अशा रीतीने झाली. यावेळी शिवाजी फक्त पंधरा वर्षाचा होता. इतक्या लहान वयात त्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले अन् ते प्रत्यक्षात आणले.

लवकरच शिवाजीने मोगलांची सत्ता झुगारून देऊन स्वराज्याची स्थापना केली. तीनशे वर्षे महाराष्ट्रभर सत्ता गाजविणाऱ्या मोगलांचा पराभव करून भारतीयांना स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन घडविले.

० ० ०

# तेजस्वी टिळक

स्वातंत्र्याच्या पूर्वी लोकमान्य टिळक हे भारताचे महान नेते होऊन गले. भारतात जागृती करण्याचे खरे कार्य लो. टिळकांनी केले. भारताच्या स्वातंत्र्याकरिता सामान्य लोकांत जागृती करणारे लो. टिळक हे पहिले नेते होत. त्यांचे नाव भारताच्या इतिहासात अमर झालेले आहे.

लो. टिळक मोठे बुद्धिमान होते. त्यांची वागणूक निर्भिड होती. त्यांच्या अंगी असामान्य धैर्य होते. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात. त्याप्रमाणे टिळकांचे अंगी हे गुण बालपणापासूनच दिसून येत होते. शाळेत असताना त्यांच्या बुद्धीची चमक सर्वांना दिपवीत होती. बुद्धीचा हा वारसा त्यांना त्यांचे वडील गंगाधरपंत यांचेकडून मिळाला होता.

गंगाधरपंत रत्नागिरी येथे मराठी शाळेत शिक्षक होते. त्यांचा संस्कृतचा अभ्यास फार चांगला होता. त्यांचे संस्कृतचे ज्ञान पाहून लोक त्यांना 'गंगाधरशास्त्री' या नावानेच ओळखत असत. संस्कृत-प्रमाणें गणिताचाही त्यांचा अभ्यास चांगला होता. त्यांनी इंग्लंडचा इतिहास, अंकगणित, लघु व्याकरण वगैरे पुस्तकेही लिहिली होती. वडिलांच्या या विद्वत्तेचा वारसा घेऊनच टिळकांनी बालपणी शिक्षणाला सुरुवात केली. तेव्हापासून अखेरपर्यंत बुद्धिवैभवाने त्यांचे जीवन तळपत होते.

लो. टिळकांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील चिखलगाव येथे दि. २३ जुलै १८५६ रोजी झाला. टिळकांच्या आईचे नाव पार्वतीबाई होते. पार्वतीबाई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांना मुलगा नव्हता. त्यांना लागोपाठ तीन मुली झाल्या होत्या. त्यामुळे आपल्याला मुलगा व्हावा म्हणून त्यांनी सूर्योपासनेचे व्रत केले. सुदैवाने पार्वतीबाईचे व्रत फळाला आले. टिळकांचा जन्म झाला. त्यामुळे घरात सर्वांना आनंद झाला. सूर्याच्या आशीर्वादामुळेच की काय लो. टिळकांचे जीवन सूर्या-सारखे तेजस्वी झाले. टिळकांनी आपल्या कर्तृत्वाने व बुद्धिमत्तेने आईच्या व्रताचे सार्थक केले !

टिळकांचे पाळण्यातले नाव केशव होते. पण घरातले व शजार-पाजारचे लोक त्यांना प्रेमाने बाळ म्हणत असत. पुढे मोठेपणीही त्यांचे जन्मनाव मागे पडलें व बाळ हेच नाव प्रचारात राहिले.

चिखलगाव येथे टिळक घराण्याचे खोती वतन होते. पण खोतीचे उत्पन्न अत्यंत कमी होते. त्यामुळे टिळकांच्या घरची गरीबीच होती. कोकणातल्या जमिनीचा उत्पन्नाकरता त्यांना काही उपयोग नव्हता. तसेच त्यांचे वडील प्राथमिक शाळेत शिक्षक होते. त्यामुळे त्यांना फारच कमी पगार मिळत असे. त्यांचा उदरनिर्वाह जेमतेम होत असे. त्यांचे सुरुवातीचे आयुष्य दारिद्र्यातच गेले. पण पुढे गंगाधरपंतांनी स्वतःच्या हिंमतीवर व कर्तृत्वावर थोडाफार पैसा मिळवला. गंगाधर-पंत मोठे काटकसरी, उद्योगी व हिशोबी होते. ते स्वाभिमानी, बुद्धिमान व तापट स्वभावाचे होते. त्यामुळे वरीष्ठांशी त्यांचे नेहमी खटके उडत असत. तरीही त्यांच्या अंगच्या हुषारीमुळे त्यांना डेप्यूटी एज्युकेशन इन्स्पेक्टरची जागा मिळाली होती. डे. एज्युकेशन इन्स्पेक्टर असताना त्यांची बदली पुण्याला झाली. पुणे म्हणजे शिक्षणाचे माहेरघर.पुण्याला येताच टिळकांच्या इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. याच सुमारास त्यांची आई वारली. त्यामुळे त्यांच्या संगोपनाची सर्व जबावदारी त्यांच्या चुलतीवर आली.

टिळकांना वयाच्या पाचव्या वर्षी रत्नागिरी येथे शाळेत घालण्यात आले. ते एकुलते एक चिरंजीव असल्याने व त्यांचे वडील स्वतः विद्वान् शिक्षक असल्याने त्यांनी घरीच अभ्यासाशिवाय पूर्णांक अपूर्णांकापर्यंत गणित, रूपावली, समासचक्र, निम्मा अमरकोश व ब्रम्हकर्माचा बहुतेक भाग पाठ करून घेतला होता. जेव्हा त्यांच्या वडिलांची बदली पुणे येथे झाली होती तेव्हा टिळक दहा वर्षांचे होते. त्या वेळीं टिळकांचा अंकगणित व समीकरणापर्यंत बीजगणिताचा पुष्कळ अभ्यास झाला होता. सामान्य श्लोकांचा अर्थ लावण्याइतके संस्कृतचे ज्ञान प्राप्त झालें होते.

लहानपणापासून टिळकांची बुद्धी तीक्ष्ण होती. तसेच ते कोणत्याही गोष्टीचा स्वतंत्रपणे विचार करीत असत. शिक्षकांनी गणित सांगितले

तर ते तोंडी करीत. त्यांच्या स्वतंत्रपणाने वागण्यामुळे काही वेळेला त्यांचे व शिक्षकांचे खटके उडत असत. एकदा शिक्षकांनी त्यांना शुद्ध-लेखन सांगितलं. त्यात 'संत' शब्द तीन वेळा आला. तो टिळकांनी संत, सन्त, सन्‌त अशा वेगवेगळ्या प्रकारांनी लिहिला. त्यांच्या शिक्षकांनी पहिला शब्द बरोबर धरला व बाकीचे चूक धरले. पण टिळकांनी ते मान्य केलें नाही. शेवटी हेडमास्तरापर्यंत हे प्रकरण गेलं. हेडमास्तरांनी टिळकांच्या बाजूने निर्णय दिला. तेव्हा त्यांचे समाधान झाले. याप्रमाणे गणित, संस्कृत, व्याकरण वगैरे विषयांतही टिळक स्वतंत्रपणे विचार करीत असत.

टिळक जसे स्वतंत्र वृत्तीचे होते तसेच त्यांना अन्याय किंवा खोटे-पणा खपत नसे. ते शिस्तीचे भोक्ते होते. त्यांचा स्वभाव हट्टी होता. पुढील आयुष्यात त्यांनी अन्यायाविरुद्ध जसा लढा दिला तसाच लहान-पणीही त्यांनी अन्यायाचा प्रतिकार केला होता. त्याची काही उदाहरणे लक्षात ठेवण्यासारखी आहेत.

टिळकांना खोटे बोलणे आवडत नसे. एकवेळ त्यांच्या वर्गातील काही मुलांनी शेंगा खाल्ल्या व त्यांची साले वर्गात टाकली. शिक्षकांच्या नजरेत ही गोष्ट येताच त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिक्षा करायला सुरुवात केली. टिळकांची जेव्हा पाळी आली तेव्हा त्यांनी शिक्षकांना सांगितलें की, "मी शेंगा खाल्ल्या नाहीत. त्यामुळे मी शिक्षा घेणार नाही." तेव्हा शिक्षक रागावले व त्यांनी टिळकांना घरी जाण्यास सांगितले. टिळक सरळ घरी गेले. पण त्यांनी शिक्षा घेतली नाही.

दुसऱ्या एका प्रसंगीही वर्गात कोणी काही तरी खोडी केली. तिचा शोध लागत नव्हता. त्यामुळे हेडमास्तर चिडले व त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना छड्या मारण्यास सुरुवात केली. पण टिळकांनी छडी घेण्याचे नाकारले. म्हणून हेडमास्तरांनी त्यांना वर्गाच्या बाहेर जाण्यास सांगितले. टिळक वर्गाच्या बाहेर गेले. त्याबरोबर सर्व मुलेही बाहेर पडली. टिळकांच्या जीवनातील जणू काय हा पहिला सत्याग्रहच होता!

टिळक शाळेत शिकत असतानाच त्यांचा विवाह १८७१ साली झाला होता. त्याकाळी आपल्याकडे बालविवाहाची पद्धत होती. त्यामुळे—

सर्वांचीच लहानपणी लग्ने होत. टिळकांच्या पत्नीचे नाव सत्यभामाबाई होते. दुर्दैवाने लहानपणी त्यांची आई वारली होती. पण टिळकांना केवळ आईचाच वियोग सहन करावा लागला नाही तर त्यांच्या लग्नानंतर थोड्याच दिवसांनी त्यांच्या वडिलांचेही देहावसान झाले. त्यावेळी टिळक केवळ सोळा वर्षांचे होते. ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. पुढे त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांच्या चुलत्यावर आली. त्यांनी टिळकांचे नाव पुण्याच्या डेक्कन कॉलेजात घातले व त्यांची होस्टेलमध्ये राहण्याची सोय केली. ते होस्टेलमध्ये राहात असले तरी त्यांच्या वर्तणुकीत व आचरणात बेशिस्त दिसून आली नाही. अभ्यासाकडेही त्यांनी कधी दुर्लक्ष केले नाही.

टिळक लहानपणापासून दृढनिश्चयी होते. ते कॉलेजात दाखल झाले तेव्हा ते अंगाने हडकुळे व अशक्त होते. त्यांचे डोळे मिचमिचित होते. त्यांच्या डोक्यात खवडे झालेले होते. त्यामुळे त्यांनी प्रथम शरीर-प्रकृती सुधारण्याचा निश्चय केला. ते रोज नियमाने व्यायाम करीत. रोज निरनिराळे खेळ खेळत. ते पोहण्यासही जात असत. त्यामुळे एका वर्षाच्या आत त्यांनी आपली शरीरप्रकृती इतकी सुधारली की त्यांच्या मित्रानाही ते ओळखले जाईनासे झाले.बुद्धिबळाला शरीर-बलाची जोड मिळाली !

कॉलेज विद्यार्थ्यांचा नाजुकपणा टिळकांच्याजवळ नव्हते. त्यांचे शरीर राकट व वागणे कणखर होते. त्यामुळे कॉलेजात इतर मुले त्यांना प्रेमाने सैतान म्हणत असत. उत्कृष्ट शरीरप्रकृतीमुळे ते एकवेळ पाय दुखत असताही सिंहगडसारखा कठीण किल्ला चढून गेले होते.

कॉलेजात टिळकांची आपल्या अभ्यासाकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. अभ्यासाबरोबर ते अवांतर वाचन खूप करीत. त्यांच्या वाचनाची गती फार जलद होती. मोठमोठी पुस्तके ते भराभर वाचून संपवीत. तसेच ते एकाग्रचित्त होऊन वाचत असत. त्यामुळे वाचलेले ते पूर्णपणे आतम-सात करीत. इतरांशी निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करण्यात ते मोठे कुशल होते. विद्यार्थ्यांबरोबर व प्राध्यापकांबरोबर त्यांचे नेहमी वादविवाद चालत असत.

टिळकांचा गणित विषय फार चांगला होता. त्यामुळे त्यांचे गणिताचे प्राध्यापक केरोपंत छत्रे यांचे त्यांच्यावर फार प्रेम होते. टिळकांचीही छत्रे यांच्यावर भक्ती होती. छत्रे यांना आपल्या या शिष्याबद्दल अभिमान वाटत होता.

एकवेळ प्रसिद्ध गणिती श्री. म्हैसाळकर यांना एक गणित अडले. त्यांनी ते प्रा. छत्रे यांना विचारले. तेव्हा त्यांनी म्हैसाळकरांना टिळकाकडे पाठविले. टिळकांनी ते गणित बरोबर सोडवून दिले. तेव्हापासून छत्रे त्यांना 'सूर्याचे पिल्लू' म्हणत असत.

टिळक व छत्रे यांची आणखी एक आठवण लक्षात ठेवण्यासारखी आहे. छत्रे आसन्नमणस्थितीत पडले असताना त्यांचे काही मित्र त्यांना भेटायला गेले. त्यातील एकाने सहज विचारले, 'नाना तुमच्या मागे गणितशास्त्र पोरके होणार. ते जिवंत कसे राहील?' त्यावर छत्रे टिळकाकडे पाहून म्हणाले, 'हा पोर काही दिग्विजय करील. त्याचे पाणी निराळेच आहे.' गुरूचे हे उद्‌गार टिळकांनी आपल्या कर्तृत्वाने खरे त्यांनी छत्रे यांचे पंचागशुद्धीचे अपुरे राहिलेले कार्य पूर्ण केले. करून दाखविले.

१८७६ साली टिळक गणित घेऊन बी. ए ला बसले व पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. नंतर ते गणित घेऊन एम. ए. ला बसले. पुढे ते ते एलएल. बी. झाले. कायद्याचा अभ्यास करीत असताना 'हिंदू धर्मशास्त्र' हा विषय त्यांचा फार आवडत असे.

टिळक कॉलेजात शिकत असताना त्यांच्याबरोबर महाराष्ट्रात व भारतात नावलौकिकाला आलेली फार मोठमोठी मंडळी होती. त्या प्रत्येकाने आपापल्या व्यवसायात व सरकार दरबारी फार लौकिक व पैसाही मिळविला. परंतु टिळकांनी मात्र सरकारी मानमरातबाची किंवा पैशाची पर्वा न करता कॉलेजमध्ये शिकत असताना ठरविलेलें समाजसेवेचे ध्येय पूर्णत्वास नेण्याचे खडतर व कठीण व्रत आचरिले. देशाच्या स्वातंत्र्याकरता त्यांनी अनेक हालअपेष्टा सहन केल्या त्यामुळेच ते 'लोकमान्य' झाले.

० ० ०

# सत्यप्रिय गांधीजी

गांधीजींनी आपल्या आत्मचरित्राला 'सत्याचे प्रयोग' असे सार्थ नाव दिलेले आहे. त्याचे हे सत्याचे प्रयोग त्यांच्या लहानपणीच सुरू झालेले होते. लहानपणापासून त्यांची सत्यावर निष्ठा होती. त्यांना आईवडिलांबद्दल व धर्माबद्दल नितांत आदर होता. गांधीजींना मोठेपणी जे श्रेष्ठत्व मिळाले त्याचा पाया या गुणांमुळे त्यांच्या बालपणीच घातला गेला होता. त्यांचे आईवडील मोठे धार्मिक होते. त्यांची आई नेहमी निरनिराळी व्रत-वैकल्ये करीत असे. गांधीजींचे वडील करमचंद ऊर्फ कबा गांधी मोठे कर्तबगार व हुषार गृहस्थ होते. ते पोरबंदर संस्थानचे दिवाण होते. ते मोठे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्याकडे सर्व धर्मांचे लोक येत व आपापल्या धर्माची माहिती सांगत असत. त्यामुळे गांधीजींना लहानपणीच सर्व धर्मांची चांगली ओळख झाली होती. त्यांना सर्व धर्मांबद्दल आपुलकी वाटत असे. सर्व धर्म सारखेच पवित्र आहेत अशी त्यांची श्रद्धा होती.

गांधीजींचा जन्म काठेवाडातील पोरबंदर येथे २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. त्यांचे शिक्षण राजकोट येथे झाले.

गांधीजी हे सर्व सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे होते. त्यांची बुद्धी विशेष तीक्ष्ण नव्हती. त्यांची स्मरणशक्तीही सामान्य होती. लहानपणी ते भिडस्त व लाजाळू होते. ते मुलांमध्ये जास्त मिसळत नसत. खेळण्याची त्यांना आवड नव्हती. शाळेत त्यांना मित्र नव्हते. ते घंटेला शाळेत जात व शाळा सुटताच सरळ घरी येत. ते थट्टामस्करीत भाग घेत नसत. शाळेत असताना त्यांना व्यायामाचा फार कंटाळा येत असे. त्यांना फिरायला जायची आवड होती. हा एकच व्यायाम त्यांना आवडत असे. ते रोज नियमाने फिरायला जात. शाळा सुटल्याबरोबर ते घरी पळत येत व आईवडिलांना मदत करीत.

आपल्या वडिलांबद्दल गांधीजींना फार आदर होता. शिक्षकांच्याबद्दलही गांधीजींना अतिशय आदर असे. शिक्षकांवर त्यांची श्रद्धा होती.

पण कोणीही त्यांना चुकीचा मार्ग दाखविला तर ते कधीही मान्य करीत नसत. त्यांना खोटेपणा मूळीच आवडत नसे. ते हायस्कूलमध्ये पहिल्या इयत्तेत शिकत असताना एकवेळ शाळेचे इन्स्पेक्टर आले.त्यांनी मुलांना पाच शब्द लिहिण्यास सांगितले. त्यात Kettle हा शब्द आला. गांधीजींनी तो चुकीचा लिहिला. तेव्हा त्यांना शिक्षकाने खूण करून पुढच्या विद्यार्थ्यांचे पाहून तो शब्द बरोबर लिहिण्यास सांगितले. पण गांधीजींनी असल्या असत्य मार्गाचा अवलंब केला नाही. त्यांनी स्वत:च्या मनाप्रमाणे तो शब्द लिहिला. त्या शिक्षकाबद्दलचा त्यांचा आदरही कमी झाला नाही. कारण ते म्हणत असत की, ‘ वडील माणसांचे दोष न पाहता गुण फक्त पाहावेत. ’

हायस्कूलमध्ये शिकत असताना गांधीजींना दुर्दैवाने काही वाईट मित्रांची संगत लागली होती. त्यामुळे त्यांच्या हातून अनेक चुकाही झाल्या. पण त्यातून ते लवकरच सावरले. त्यांचा एक मित्र फार दुर्वर्तनी होता. गांधीजींनाही याची कल्पना होती. त्यांना वाटे की, आपण त्याच्यात सुधारणा करू शकू. परंतु दुर्दैवाने त्याच्यात सुधारणा होण्याच्याऐवजी गांधीजी मात्र त्याच्या संगतीने वाईट मार्गाला लागले.

गांधीजी हे वैष्णव होते. त्यांचे आईवडील अत्यंत कर्मठ व :धार्मिक होते. त्यांच्या कुटुंबात मांसाहार निषिद्ध होता. परंतु या मित्राच्या संगतीमुळे ते मांसाहर करू लागले. त्या मित्राने सांगितले की, “ आपण मांसाहार करीत नाही म्हणून आपण कमजोर व नेभळट आहोत. इंग्रज लोक मांसाहर करतात म्हणून ते बलवान असतात. त्यामुळे ते आपल्यावर राज्य करतात. मांसाहाराने माणसाला शक्ती येते. सगळे सुधारलेले लोक मांसाहार करतात.”

मित्राच्या या युक्तिवादाचा गांधीजींवर चांगला परिणाम झाला. सुधारलेले लोक मांसाहर करतात, म्हणून आपणही मांसाहार केला पाहिजे आणि बलवान होऊन इंग्रजांचा पराभव केला पाहिजे असे गांधीजींना वाटू लागलें. म्हणून ते मांसाहाराला तयार झाले. परंतु लवकरच त्यांना आपली चूक कळून आली. त्यांचा भ्रम दूर झाला. आपण आईवडिलांना फसवत आहोत व त्यांना फसवून सत्याच्या

विवाहात चांगले कपडे घालायला मिळतील, वाजंत्री वाजतील, चांगले जेवण मिळेल आणि एका नव्या मुलीबरोबर खेळायला मिळेल, एवढेच त्यांना कळत होते. लग्न झाले तेंव्हा ते आपल्या पत्नीला लाजत तर पत्नी त्यांना लाजत असे. पुढे हळूहळू ती एकमेकांना चांगली ओळखू लागली. या विवाहामुळे गांधीजींच्या शिक्षणात मात्र मुळीच व्यत्यय आला नाही.

गांधीजी लहानपणी फार भित्रे होते. त्यांना चोर, साप, भूत यांची फार भीती वाटत असे. ते अंधारात जायला घाबरत असत त्यांच्या मानाने कस्तुरबा फार धीट होत्या. त्या अंधारात एकट्या जात असत. यामुळे गांधीजींना स्वतःच्या भित्रेपणाची लाज वाटत असे. स्वतःचा भित्रेपणा घालवण्याकरताच त्यांनी मांसाहार करायचे ठरविले होते. परंतु भित्रेपणा घालविण्याचा व मांसाहाराचा काही संबंध नाही याची खात्री पटताच त्यांनी तो मार्ग सोडून दिला.

१८८७ साली गांधीजी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर ते भावनगरला शामलदास कॉलेजात दाखल झाले. परंतु तेथे त्यांना काहीच जमेना. इतक्यात त्यांच्या कुटुंबाच्या एका हितचिंतकाने गांधीजींना इंग्लंडला बॅरिस्टर होण्याकरता पाठवण्याचा सल्ला दिला. परंतु त्यांच्याजवळ इंग्लंडला जाऊन शिक्षण घेण्याइतके पैसे नव्हते. तेंव्हा त्यांच्या भावाने कर्ज काढून पैसे दिले. गांधीजींनी इंग्लंडला जाण्याची तयारी केली व ते मुंबईला आले. इकडे त्यांच्या जातीच्या लोकांनी त्यांना जातीबाहेर टाकले. कारण त्याकाळी काही कर्मठ लोक इंग्लंडला किंवा परदेशास जाणे निषिद्ध मानत असत. पण गांधीजी जातीच्या लोकांच्या धमकीला मुळीच घाबरले नाहीत. ते १८८८ साली इंग्लंडला गेले.

प्रथम गांधीजी इंग्लंडमध्ये श्रीमंत विद्यार्थ्यांसारखे राहू लागले. चैन करू लागले. इंग्लंडमधील समाजात वावरायचे तर आपल्या इंग्रज लोकासारखे नृत्य व गाणे शिकले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. म्हणून त्यांनी नृत्य व व्हायोलिन शिकायला सुरुवात केली. त्याकरता शिक्षकांना पैसे दिले. परंतु लवकरच त्यांना कळुन आले की त्यांना या

कला शिकून काही सभ्य बनता येणार नाही. सभ्य वागणुकीकरता नृत्याची व व्हायोलिनची आवश्यकता नाही. ते काही इंग्लंडमध्ये कायमचे राहायला आले नव्हते. विद्याभ्यास झाला की ते भारतात परत येणार होते. तसेच त्यांना त्यांच्या भावाने कर्ज काढून शिकायला पाठविले होते. त्यामुळे त्यांनी हे सर्व नाद सोडून दिले व आपले लक्ष अभ्यासावर केंद्रित केले. त्यांनी काटकसरीने राहून आपले शिक्षण पूर्ण केले. ते पैन् पैचा हिशोब ठेवत व शाकाहारी जेवण घेत असत. इंग्लंडमध्ये असताना त्यांनी कधी मांसाहार केला नाही किंवा मद्यपान केले नाही. १८९१ साली गांधीजी बॅरिस्टर होऊन भारतात परत आले.

गांधीजींचे बालपण विविध प्रकारच्या अनुभवांनी भरलेले आहे. दुर्गुणांवरही सत्याच्या, विवेकाच्या व श्रद्धेच्या जोरावर कसा जय मिळवता येतो हे गांधीजींच्या जीवनावरून दिसून येते. गांधीजींना आपल्या विद्यार्थीदशेत दोन गोष्टीकडे दुर्लक्ष केल्याबद्दल नेहमी दुःख होत असे. ते म्हणजे संस्कृतचा अभ्यास व हस्ताक्षर. या गोष्टी विद्यार्थ्याने अवश्य हस्तगत केल्या पाहिजेत असे गांधीजींचे मत होते.

आपल्या कर्तृत्वाने, त्यागाने व निःस्वार्थी सेवेने ते 'राष्ट्रपिता' झाले. परंतु त्यांचे बालपणही अशा अनेक चढउतारांनी भरलेले आहे.

० ० ०

# मांगल्यमूर्ती साने गुरुजी

साने गुरुजीच्या गोड गोष्टी वाचल्या नाहीत असा विद्यार्थी आढळणे शक्य नाही. एकदा त्यांच्या रसाळ भाषेतील गोष्टी वाचल्या म्हणजे मुलांना त्यांचे वेडच लागते मुलांचे ते आवडते लेखक आहेत.महाराष्ट्रातील आजच्या तरुण पिढीला तर त्यांच्या वाङमयाचे वेड लागले होते यात मुळीच शंका नाही. तरुणांमध्ये राष्ट्रीयवृत्ती निर्माण करण्याचे कार्य त्यांनी लेखणी व वाणीच्या द्वारा केले ते आधुनिक 'संत' होते. सर्वजण त्यांना 'गुरुजी' या नावानेच ओळखत असत. 'गुरुजी' म्हटलं की आजही आपल्या डोळ्यापुढे साने गुरुजींचीच मूर्ती उभी राहते.

साने गुरुजी महान् त्यागी देशभक्त होते. ते पुरोगामी विचारवंत व राष्ट्रीय लेखक होते. ते तळमळीचे समाजसुधारक होते. देशाचा संसार करता यावा म्हणून त्यांनी स्वतःचा संसार मांडला नाही. अशा या थोर व्यक्तीचे बालपण मात्र फार हालअपेष्टांत व दारिद्र्यात गेले. शिक्षण मिळविण्याकरिता त्यांना अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले. आपलं गाव, आईवडिलांना व भावंडांना सोडून वणवण हिंडावं लागलं. आईवडिलांचा आधार नाही, नातलगांची मदत नाही अशा परिस्थितीत त्यांना कधी मधुकरी मागून तर कधी उपाशी राहून आपले शिक्षण पूर्ण करावे लागले.

साने गुरुजीच्या मनात शिक्षणाची आवड व ते मिळविण्याकरिता लागणारी जिद्द त्यांच्या आईने निर्माण केली. त्याच्या आईने त्यांच्या मनावर उच्च संस्कार केले. आईने दिलेली ही महान् देणगी त्यांना आयुष्यभर पुरली. साने गुरुजीचे हृदय मातेसारखे कोमल व प्रेमळ होते. याचे कारण म्हणजे त्यांच्या आईने त्यांना दिलेली मातृप्रेमाची थोर देणगी होय.

साने गुरुजीचा जन्म दिनांक २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे झाला. त्यांचे नाव पांडुरंग होते. त्यांच्या वडिलांचे नाव सदाशिव होते. त्यांचे वडील चिपळूण तालु-

कणातील वडवली गावचे खोत होते. खोती वंशपरंपरेने चालते. खोताचा मान मोठा असला तरी खोत म्हणजे नुसता वसुली कारकून. खोतांचा शेतकऱ्यांवर वचक असला तरी त्यांचीं आर्थिक स्थिती गरीबीचीच असते. साने गुरुजींच्या घरची स्थितीही गरिबीचीच होती. त्यांच्या वडिलांना भाऊराव म्हणत असत.

भाऊरावांची परिस्थिती चांगली होती. परंतु पुढे सावकाराने त्यांची जमीन, घरदार वगैरे लुबाडले. त्यामुळे त्यांची परिस्थिती फार गरीबीची झाली. त्यांना साध्या झोपडीत राहण्याची पाळी आली. लहानपणापासून साने गुरुजींना गरिबीच्या यातना सहन कराव्या लागल्या. त्यांना कोकणातील शेतकरी व गरीब जनता ज्या हालअपेष्टा सहन करते याचा प्रत्यक्ष अनुभव आला होता.

भाऊराव गरीब असले तरी त्यांना सरस्वतीचे वरदान होते. त्यांचे संस्कृतचे ज्ञान चांगले होते. त्यांची अनेक संस्कृत स्तोत्रे व सुभाषिते पाठ होती. त्यामुळे साने गुरुजींनाही लहानपणापासून संस्कृतची गोडी लागली.

भाऊरावांनी संस्कृत भाषेचा व विद्येचा वारसा साने गुरुजींना दिला, तर आईने प्रेमाचा, सदाचाराचा व भारतीय संस्कृतीचा वारसा दिला. साने गुरुजींच्या अंगी जे सद्‌गुण होते त्यांचीं शिकवण त्यांच्या प्रेमळ आईने लहानपणी त्यांना दिली होती फारसे लिहितावाचता येत नसल्याने त्यांच्या आईची गणना शिक्षित स्त्रियात करता आली नसती, तरी तिला जगाच्या व्यवहाराची, धर्माची, मुलांच्या शिक्षणाची, दारिद्र्यातही संसार सुखी करण्याची चांगली समज होती. घरच्या दारिद्र्यातही त्यांच्या आईने संसार नीटनेटका केला. मुलांना चांगले वळण लावले. प्राणीमात्रांवर, वृक्षांवर, फुलांवर प्रेम करायला शिकवले.

साने गुरुजींच्या घरी मोरी नावाची गाय होती. ती मेली त्या दिवशी त्यांच्या आईने जेवण केले नाही. एकवेळ लहानपणी साने गुरुजींनी झाडाच्या कळ्या तोडल्या. तेव्हा आई त्यांच्यावर रागावली. ती म्हणाली, "कोवळ्या कळ्या तोडू नये. त्यामुळे झाडांना दुःख होतं.

त्यांना चांगले उमलू द्यावे. मग तोडावे." आईने अशा रीतीने त्यांना सृष्टीवर प्रेम करायला शिकविले.

साने गुरुजींची आई आपल्या नोकरावर स्वत:च्या मुलाइतकंच प्रेम करीत असे. फक्त आपल्या मुलांवर प्रेम करायचे व नोकरांना तुच्छतेने वागावयाचे त्या प्रमळ मातेला पसंत नव्हतं. एक वेळ त्यांची मथुरी नावाची मोलकरीण आजारी पडली. गरीबीमुळे तिच्या घरात आजारात खायला नव्हतं. तेव्हा त्यांच्या आईने तिला खायला भात व लोणचे पाठविलं. आणि औषध पाठवून तिची विचारपूस केली. 'गरीबीवर' हजार व्याख्यानं देण्यापेक्षा त्यांच्या आईने केलेली ही एकच गोष्ट मुलांना 'गरीबांवर दया करा' हे शिकवायला पुरेशी होती.

लहानपणी साने गुरुजींचा स्वभाव फार हट्टी होता. त्या हट्टी स्वभावाचे कोड पुरवीत असताही आईने त्यांना प्रेमाची शिकवण दिली. एक दिवस स्नान केल्यावर गुरुजींनी पायाला माती लागू नये. म्हणून आईला जमिनीवर आपला पदर पसण्याला सांगितले. आईने त्यांचा तोही हट्ट पुरवला. पण आई त्यांना म्हणाली, 'पायाला माती लागू नये म्हणून जसा जपतोस तसाच आपल्या मनाला घाण लागू नये म्हणून जप !"

या साध्या शब्दांतून साने गुरुजौना किती अमोल शिक्षण मिळाले असेल हे सांगण्याची गरज नाही. त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांनी हीच शिकवण प्रत्यक्ष आचरणास आणली.

निसर्गावर, प्राणीमात्रांवर व मानवावर प्रेम करण्याची शिकवण आईने त्यांना दिली. म्हणून ते आपल्या आईला 'कल्पतरू' म्हणत असत. पैशाने मोठे होण्यापेक्षा मनाने मोठे होण्यास' आई त्यांना शिकवले !

साने गुरुजी लहानपणी हट्टी होते तसे जिद्दी पण होते. कोणतीही गोष्ट त्यांनी मनात घेतली तर ते ती पूर्ण केल्याशिवाय रहात नसत. कोकणात पत्रावळी व द्रोण घरीच करतात. ही कला तेथे प्रत्येकालाच येते. मुले व मुली ही कला लहानपणीच शिकतात. पण साने गुरुजींना बरेच दिवस पत्रावळी व द्रोण करता येत नसत. त्यामुळे इतर मुलं

त्यांना चिडवत. तेव्हा एक दिवस साने गुरुजी मुलांनी चिडवल्यामुळे रागावले व आपण मुळीच द्रोण व पत्रावळी करणार नाही असा हट्ट घेऊन बसले. त्यामुळे आई त्यांच्यावर रागावली. तिने त्यांना द्रोण व पत्रावळी स्वत: केल्याशिवाय जेवायला मिळणार नाही असा धाक घातला. साने गुरुजींनी स्वत:ची चूक कळून आली. त्यांनी पत्रावळी तयार करण्याची कला बहिणीकडून शिकून घेतली. ते पत्रावळी व द्रोण स्वत: तयार करू लागले.

साने गुरुजींच्या जिद्दी स्वभावाचे दुसरे एक उदाहरण लक्षात ठेवण्यासारखे आहे. साने गुरुजींना बरेच दिवस रामरक्षा येत नव्हती. त्यांच्या शेजारचा एक मुलगा रामरक्षा पाठ म्हणे. तो त्यांच्याशी गर्वाने बोलत असे. गुरुजींच्या जवळ रामरक्षेचें पुस्तक नव्हते. त्यामुळे मनात असूनही त्यांना रामरक्षा पाठ करता येईना. म्हणून त्यांनी एक दिवस त्या मुलाजवळून रामरक्षेचे पुस्तक आणले आणि सर्व रामरक्षा लिहून काढली व आठ दिवसात तोंडपाठ केली. तेव्हा आईने व वडिलांनी फार कौतुक केले.

साने गुरुजींना शिक्षणाकरीता फार कष्ट करावे लागले. घरची गरिबी असल्याने त्यांना उच्च शिक्षण मिळण्ची फारशी आशा नव्हती. शिवाय त्यांच्या गावात इंग्रजी शिक्षणाची सोय नव्हती. परंतु त्यांना शिक्षणाची फार आवड होती व त्यांच्या आईवडिलांचीही त्यांना शिक्षण देण्याची इच्छा होती. म्हणून वडिलांनी त्यांना पुण्याला मामाकडे पाठविले. पण तेथे साने गुरुजींचा शांत स्वभाव व मामांचा तापट व संतापी स्वभाव याचा मेळ बसेना. अभ्याबद्दल मामा त्यांना रागवत. गुरुजींना ते सहन होईना. म्हणून एक दिवस ते गुपचूप वडिलांकडे परत आले. नंतर त्यांनी औंधला शिक्षणाची सोय केली. तेथूनही त्यांना काही अडचणीमुळे शिक्षण सोडून परत यावं लागलं. नंतर ते पुन्हा पुण्याला गेले. अशा रीतीने शिक्षणाकरिता त्यांना पालगड, मुंबई, पुणे, औंध येथे पायपीट करावी लागली. कधी मित्रांच्या घरी, कधी मधुकरीवर तर कधी बोर्डिंगात निर्वाह करावा लागला. एकवेळ जेवण करून त्यांना कित्येक दिवस काढावे लागले. कधी कधी आठवड्यातून फक्त तीन दिवस जेवण करून राहावे लागे. कपड्यांच्या बाबतीत त्यांनी कधी ऐट केली नाही. मिळतील ते साधे व जाडेभरडे कपडे वापरून त्यांनी आपले विद्यार्थी जीवन घालवले. ते पुण्याच्या नूतन मराठी विद्यलयातून १९१८ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर न्यू पूना कॉलेज-

मधून ते १९२२ साली बी. ए. झाले आणि १९२४ साली एम. ए. झाले. मातृभूमीप्रमाणे मातृभाषेवरही त्यांचे प्रेम होते. बी. ए. ला त्यांनी नव्याने सुरू झालेला मराठी विषय घेतला. मराठी व संस्कृतचे ते स्कॉलर होते. त्यांची मराठी विषयाची उत्तरपत्रिका त्यांच्या शिक्षकांनी जपून ठेवली होती.

लहानपणापासून साने गुरुजींना गोष्टी सांगण्याची फार आवड होती. समवयस्क मित्रांना व भावंडांना जमवून ते गोष्टी सांगत असत. त्यामुळे त्यांना पुढे गोष्टी सांगण्याची व लिहिण्याची कला चांगली अवगत झाली. लहानपणी त्यांना वाचनाचा फार नाद होता. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या, भवभूतीचें उत्तर रामचरित्र, स्माइल्सचें कॅरॅक्टर त्यांना फार आवडत असे. त्यांना पुस्तकातील जे उतारे आवडत ते ते लिहून काढत व पाठ करीत असत. त्यामुळे त्यांचें मराठी व इंग्रजी हे विषय फार चांगले होते. अनुप्रास असलेले इंग्रजी व मराठी शब्द जमवून ते पाठ करीत असत.

विद्याभ्यास व वाचन याशिवाय त्यांना इतर कोणत्याही गोष्टीचें आकर्षण नव्हते. ते स्वत: गरीब असले तरी त्यांना आवडतील ती पुस्तके ते विकत घेत व आत्मसात करीत असत. रामकृष्ण वाक्यसुधा, रामतीर्थांचें ग्रंथ, निरनिराळ्या देशभक्तांची चरित्रे वगैरे पुस्तके त्यांनी जेवणाचें पैसे वाचवून विकत घेतली होती.

साने गुरुजींना वाचनाची आवड असली तरी त्यांनी आपल्या अभ्यासाकडे कधी दुर्लक्ष केले नाही. बी. ए. ला त्यांनी फेलोशिप मिळवली होती.

शिक्षण संपल्यावर साने गुरुजींना चांगली नोकरी मिळाली असती व त्यांचे दारिद्र्य नाहीसे झाले असते. परंतु ते पैशाच्या किंवा सुखाच्या मागे लागले नाहीत. त्यांनी अंमळनेर येथील प्रताप विद्यालयात कमी पगाराची शिक्षकाची नोकरी पत्करली. तेथे त्यांनी विद्यार्थ्यांना मदत करून त्यांच्यात राष्ट्रीय जागृति केली. आपली वाणी व लेखणी त्यांनी विद्यार्थ्यांकरिता झिजवली. पुढे त्यांना शाळेचे विश्व संकुचित वाटू लागले. म्हणून त्यांनी चार भिंती आडची शिक्षकाची नोकरी सोडून ते सर्व समाजाचे 'गुरुजी' होण्याकरता शाळेच्या बाहेर पडले व राष्ट्रीय आंदोलनात सामील झाले. याच काळात त्यांनी लहानथोरांकरता वाङ्मय निर्मिती केली आणि असंख्य तरुणांना देशभक्तीची स्फूर्ती दिली.